


दैनिक
निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ  Mob- 9822720784  Email- jansanchlan@gmail.com  RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे  अंक : ३९५ वा  दि २० जून २०२६  पृष्ठ ८  किंमत ३ रुपये

# विरोधात निकाल, ओमराजेंचं वेट अँड वॉच; ठाकरेसेनेनं फिल्डींग लावली, ऑपरेशन टायगर धोक्यात

**मुंबई**

काँग्रेस नेते पवनराजे निंबाळकर आणि त्यांचे कार चालक समद काझी यांच्या हत्या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी खासदार आणि माजी गृहराज्यमंत्री यांच्यासह सगळ्या ९ आरोपींची निर्दोष सुटका करण्यात आली आहे. तब्बल २० वर्ष जुन्या खटल्यात विशेष सीबीआय न्यायालयानं निकाल दिला. माफीच्या साक्षीदाराची साक्ष विश्वासार्ह नसल्याचं न्यायाधीशांनी म्हटलं. या पार्श्वभूमीवर बोलताना पवनराजे यांचे पुत्र आणि धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी कलियुग आल्याचं म्हटलं. शिंदेंच्या शिवसेनेत जाण्याचा निर्णय मी अद्याप घेतलेला नाही. मतदारसंघात जाऊन दोन दिवसांत निर्णय घेईन, असंही ओमराजेंनी म्हटलं आहे. त्यामुळे ठाकरेसेनेतून फ टलेल्या अन्य ५ खासदारांची धडधड वाढली आहे. हा निकाल दुर्दैवी असल्याचं म्हणत खासदार ओमराजेंनी त्यांच्या भावना बोलून दाखवल्या. गेल्या २० वर्षापासून आरोपींना शिक्षा होण्यासाठी आम्ही आणि तपास यंत्रणा अखंडपणे प्रयत्न करत होत्या. या निकालाविरोधात उच्च न्यायालयात जाणार आहोत, अशी प्रतिक्रिया ओमराजेंनी दिली. हे कलियुग असल्याचं म्हणत कलियुगात वाईटाला जास्त बळ असतं. चांगल्याला लवकर यश मिळत नाही. मी मतदारसंघात जाऊन पुढील निर्णय घेईन, असंही ओमराजे म्हणाले. हा खटला आणि माझ्या राजकीय निर्णयाचा (पक्षांतर) काहीही संबंध नव्हता. मला माझ्या मतदारसंघातील लोकांशी चर्चा करायची आहे. त्यांच्या भावना जाणून घ्यायच्या आहेत, असं ओमराजेंनी म्हटलं. लोकसभेत ठाकरेसेनेचे ९ खासदार होते. पैकी दोन तृतीयांश म्हणजेच ६ खासदारांनी ठाकरेसेनेची साथ सोडली. हे खासदार शिंदेसेनेच्या वाटेवर आहेत. पक्षांतरबंदी कायद्यानुसार होणारी कारवाई टाळायची असल्यास किमान ६ खासदारांना ठाकरेंची साथ सोडावी लागेल. पण आता निकालानंतर ओमराजेंच्या पक्षांतराबद्दल संभ्रम आहे. त्यामुळे शिंदेसेनेचं ऑपरेशन टायगर फसण्याची शक्यता निर्माण झाली. दुसरीकडे ठाकरेंची शिवसेना सक्रिय झाली आहे. न्यायालयाचा निकाल येताच ठाकरेसेनेचे खासदार अनिल देसाई यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. ओमराजेंचा विश्वासघात झाला आहे. ते परत येणार



असतील, तर उद्धव ठाकरे निर्णय घेतील, असं म्हणत देसाईंनी परतीचे दरवाजे उघडे असल्याचे संकेत दिले आहेत. ओमराजे माघारी फिरल्यास अन्य ५ बंडखोर कायद्याच्या कचाट्यात अडकू शकतात. त्यांची खासदारकी रद्द होऊ शकते. हा खटला ओमराजे निंबाळकर यांच्या जीवनातील मोठ्या राजकीय संघर्षाचा भाग होता. त्यांना दिलेला शब्द, दिलेली आश्वासनं, ज्या काही गोष्टी त्यांना सांगण्यात आलेल्या असतील. ज्यांच्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. पण आता त्यांचा विश्वासघात झालेला आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंसोबत बोलावं. ते याबद्दल निर्णय घेतील. पण त्यांनी पक्षशिस्त मोडलेली आहे. पक्षाच्या बैठकीवर त्यांनी बहिष्कार घातला होता. त्यांनी पक्षशिस्तीचा भंग केला, याची आठवणही त्यांनी करुन दिली.

# ओमराजेंचं बंड उद्धव ठाकरेंच्या जिव्हारी; निवडणुकीच्या सभेतील तो प्रसंग सांगत सगळंच काढलं!

**मुंबई**

शिवसेनेच्या साठाव्या वर्धापन दिनानिमित्त षण्मुखानंद सभागृहात मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला संबोधित करताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बंडखोर खासदारांवर जोरदार तोफ डागली. उद्धव ठाकरे यांच्या भाषणातील सर्वाधिक रोख हा धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर होता. कारण मातोश्रीसोबत आयुष्यात कधीही गद्दारी करणार नाही, असं ओमराजे वारंवार सांगत असत. ओमराजे निंबाळकर यांनी साथ सोडल्यानंतर काल झालेल्या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यानचा एक किस्सा सांगत ओमराजेंचा समाचार घेतला. उद्धव ठाकरे म्हणाले की, कैलास पाटील साक्षीदार आहेत. लोकसभा निवडणुकीत धाराशिव मतदारसंघातील प्रचारादरम्यान माझ्या सभेनंतर एक शेतकरी आला. कळकट मळकट कपड्यातील तो शेतकरी होता. शेतकरी-कष्टकरी म्हटल्यावर कशी कपडे असणार...तर त्या गरीब शेतकऱ्याने खिशातून एक बटवा काढला आणि तो शेतकरी म्हणाला की तुमच्या हस्ते ही मदत आपल्या उमेदवाराला मला द्यायची आहे. त्या बटव्यात किती पैसे असतील? एका सामान्य शेतकऱ्याची कमाई किती असते? पण त्या प्रेमाच्या एका रुपयाने ती निवडणूक आपण जिंकलो होतो. समोरून पैशाचा महापूर होता...धबधबा कोसळत होता. ५० कोटी काय, १०० कोटी काय... असा हरामाचा पैसा ओतला जात होता. कारण शिवसेनेला हरवायचं होतं. मात्र तरीही शेतकऱ्यांसारख्या साध्या-साध्या माणसांनी त्यांच्या कष्टाचा पैसा देऊन आपले खासदार जिंकून आणले होते. कुठे फेडाल ही पापं? कुठे फेडाल? तेच उमेदवार सभेत बोलले होते की खंडोजी खोपडे नाव घेतले की तुम्ही काय म्हणता? सूर्याजी पिसाळ नाव घेतलं की तुम्ही काय म्हणता? या लोकांना ४०० वर्षे झाली तरी त्यांच्या कपाळावरचा गद्दारीचा शिक्का पुसता आला नाही. तुम्हाला किती वर्षे लागतील कपाळावरचा गद्दारीचा शिक्का पुसायला? असा सवाल ठाकरे यांनी केला आहे. लोकशाहीला मोठा धोका निर्माण झाला आहे, आता आपल्या सगळ्यांना मिळून भाजपविरोधात ङ्कऑपरेशन कमळफ करावे लागेल, असं आवाहनही उद्धव ठाकरे यांनी केलं. तुमच्या मतांवरच ते निवडून आले आहेत. वाट कशाची बघताय, त्यांना जाब विचारण्याचा तुमचा अधिकार आहे. तुम्ही त्यांना जाब विचारा, असं सांगत उद्धव ठाकरे यांनी फुटीर खासदारांविरोधात कारवाई करण्याचाही अप्रत्यक्षरीत्या आदेश शिवसैनिकांना दिला. भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर एकीकडे तोफ डागताना, दुसरीकडे उपस्थित शिवसैनिकांना भावनिक सादही घातली. मी खचलेलो नाही, मी डगमगलेलो नाही. आधी अशी अनेक संकटे आपण झेलली असल्याचे ते म्हणाले. जा त्यांना जाब विचारा... आधी म्हणायचे, मोदींच्या जीवावर निवडून आले होते. मात्र, आताची निवडणूक तर आमचीच होती ना? समोरून पैशांचे धबधबे होते. पण हे गोरगरीब, कष्टकरी- शेतकऱ्यांच्या मदतीवर निवडून आले. तुम्ही यांना निवडून आणले. मग आता कुठल्या आदेशाची वाट बघताय? आदेश तर बाळासाहेबांनी कधीचाच दिलाय. जा त्यांना जाब विचारा, असेही उद्धव ठाकरे शिवसैनिकांना म्हणाले.

# विकासाच्या धुळीत गुदमरलेली शहरे



राज्यात मोठ्या प्रमाणात शहरीकरण सुरू असल्याने शहरांकडे होणारे स्थलांतर वाढले आहे. शहरांत घरनिर्मिती आवश्यक ठरत आहे. सध्या सर्वत्र सोसायट्यांच्या पुनर्विकासाची कामे तसेच नवीन लहान मोठे गृहनिर्माण प्रकल्प सुरू आहेत. तसेच महापालिकेमार्फत अनेक काँक्रीट रस्त्यांची कामे सुरू आहेत. भुयारी गटारांची कामे व देखभाल सुरू असल्याने अनेक ठिकाणी रस्ते खोदण्यात आल्याचे दिसून येते. वाहनांच्या पार्किंगसाठी अनेक गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये तळघरांची निर्मिती करण्यात येत असून त्यासाठी मोठ्या प्रमाणात माती खोदकाम आणि माती वाहतूक केली जात आहे. बांधकाम म्हटले की माती खुदाई होणारच. काँक्रीटची वाहतूक ट्रान्झिट मिक्सरद्वारे केली जाते. सिमेंट, वाळू आणि खडी यांची वाहतूक करावी लागते. इमारत बांधकामात सिमेंटसह निर्माण होणारी सूक्ष्म धूळ वाऱ्यासोबत परिसरात पसरते. काही ठिकाणी काँक्रीट ग्राइंडिंगची कामे चालू असतात, त्यामुळे सिमेंट डस्ट पुन्हा वातावरणात मिसळते. काही ठिकाणी आगाऊ जमा झालेले काँक्रीट तोडले जाते. इमारतींमध्ये टाइलिंग करताना मोठ्या प्रमाणात डेब्रिज तयार होते आणि ते गार्बेज टनेलमधून खाली फेकले जाते. खुदाईनंतर मातीची शहराबाहेर वाहतूक करताना ती डम्परमधून आजूबाजूला पसरते. एकंदर बांधकाम प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर धूळ निर्माण होत असते. पावसाळ्यात हीच माती आणि बांधकामातील अवशेष गटारांमध्ये जाऊन पाणी निचरा व्यवस्थेवर ताण आणतात आणि अनेक भागांत पाणी साचण्याच्या समस्या निर्माण होतात. बांधकाम प्रक्रियेदरम्यान निर्माण होणारे ध्वनिप्रदूषणही तितकेच गंभीर आहे. ड्रिलिंग, पाइलिंग, ब्रेकर मशीन, भुयारी मार्ग खोदणारी मशीन्स आणि काँक्रीट मिक्सरमधून निर्माण होणारा मोठा आवाज विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, रुग्णालय परिसरातील रुग्णांवर तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करत आहे. भुयारी मार्ग खोदकाम करताना खूप मोठ्या प्रमाणात माती व दगडांची वाहतूक करण्यात येत असल्याने धुळीचे प्रमाण वाढत चालले आहे. मुंबईसह अन्य शहरांमध्ये सुरू असलेल्या वेगवान बांधकामांनी शहरांचे रूप बदलले असले, तरी या विकास प्रक्रियेत उडणारी धूळ (कन्स्ट्रक्शन डस्ट) आता गंभीर सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न ठरत आहे. रस्ते रुंदीकरण, मेट्रो प्रकल्प, उंच इमारती, पुनर्विकास आणि पायाभूत सुविधांच्या कामांतून हवेत मिसळणारी सिमेंट, वाळू, चुनखडी आणि धातूंची सूक्ष्म धूळ श्वसनमार्गातून थेट मानवी शरीरात प्रवेश करत आहे. यातून आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होत असून, त्याचा सर्वाधिक फटका बांधकाम क्षेत्रातील कामगारांना बसतो. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या () आकडेवारीनुसार, शहरी भागांतील पीएम १० आणि पीएम २.५ प्रदूषणात बांधकाम क्षेत्राचा वाटा ३० ते ४० टक्क्यांपर्यंत आहे. ही सूक्ष्म कणधूळ फुफ्फुसांमध्ये खोलवर साचते. पीएम २.५ कणांचा आकार २.५ मायक्रॉनपेक्षा कमी असल्याने ते रक्तप्रवाहातही प्रवेश करू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेने स्पष्ट केले आहे की, दीर्घकाळ या कणांच्या संपर्कात राहिल्यास दमा, क्रॉनिक ब्रॉन्कायटिस, हृदयविकार, स्ट्रोक तसेच अकाली मृत्यूचा धोका वाढतो. भारतातील आयसीएमआर आणि जीबीडी (ग्लोबल बर्डन ऑफ स्टडीज) अभ्यासानुसार, वायुप्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांमुळे देशात दरवर्षी १५ ते १६ लाखांहून अधिक अकाली मृत्यू होतात. यातील मोठा हिस्सा शहरी बांधकाम-संबंधित धुळीशी जोडलेला असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. मुंबई, दिल्ली, पुणे, बेंगळुरू यांसारख्या शहरांमध्ये हिवाळ्यात व कोरड्या हंगामात बांधकामस्थळांजवळील पीएम १० पातळी परवानगीपेक्षा दुपटीने वाढली आहे. बांधकाम प्रकल्पावर निर्माण होणाऱ्या धुळीचा सर्वाधिक फटका बांधकाम कामगार, रस्त्यालगत राहणारे नागरिक, वृद्ध, लहान मुले आणि दमा किंवा हृदयविकार असलेल्या रुग्णांना बसतो. मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या निरीक्षणानुसार, गेल्या काही वर्षांत श्वसनविकारासाठी बाह्यरुग्ण विभागात येणाऱ्या रुग्णसंख्येत २० ते २५ टक्क्यांची वाढ दिसून आली आहे. डोळ्यांची जळजळ, त्वचारोग, सतत खोकला, केस गळती आणि श्वासोच्छ्वासाचा त्रास ही लक्षणे सामान्य होत चालली आहेत. बांधकाम कामगारांसाठी नियमित फुफ्फुस तपासणी, आरोग्य विमा, दर्जेदार मास्क आणि सुरक्षितता प्रशिक्षण अनिवार्य करण्याची गरज आहे. नियमांनुसार बांधकामस्थळी पाणी फवारणी, हिरवे जाळे (ग्रीन नेट), बांधकाम साहित्य झाकणे, वाहतूक करताना ट्रक कव्हर करणे आणि मलबा शास्त्रीय पद्धतीने हटवणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या उपाययोजना कागदापुरत्याच मर्यादित राहतात. सीपीसीबी आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळांनी वारंवार इशारे दिले असले तरी अंमलबजावणीतील ढिलाईमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# देशात आणीबाणी लागणार! मोदी वर्षभरात पंतप्रधान पद सोडणार; राहुल गांधींच्या दाव्याने खळबळ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**



काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत धक्कादायक दावे करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. एका कार्यक्रमात बोलताना राहुल गांधी यांनी पुढील एका वर्षात नरेंद्र मोदी पंतप्रधानपदावर राहणार नाहीत, असा अंदाज व्यक्त केला आहे. तसेच देशात मोठे आर्थिक संकट येण्याची आणि लोकांच्या विरोधामुळे आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात बोलताना राहुल गांधी म्हणाले की, देशातील परिस्थिती वेगाने बदलत आहे आणि सत्ताधाऱ्यांच्या नियंत्रणातील व्यवस्था आता ढासळू लागली आहे. त्यांच्या मते, सरकारच्या आतूनच संस्थात्मक पातळीवर विरोध सुरू झाला असून विविध यंत्रणांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. राहुल गांधी यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेबाबतही गंभीर इशारा दिला. त्यांच्या मते, केंद्र सरकारने अर्थव्यवस्थेला संरक्षण देणाऱ्या अनेक महत्त्वाच्या यंत्रणा कमकुवत केल्या आहेत. त्यामुळे आगामी काळात देशाला मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागू शकतो. ते म्हणाले, देशात अशी आर्थिक त्सुनामी येणार आहे, जी लोकांनी यापूर्वी कधीच पाहिलेली नाही. अर्थव्यवस्थेचे संरक्षण करणारे कवचच काढून टाकण्यात आले आहे.

### 'व्यवस्थेच्या आतूनच बंड सुरू'

राहुल गांधी यांनी दावा केला की, काही महत्त्वाच्या संस्थांमधून त्यांना मेसेज येत आहेत. निवडणूक आयोग, गुप्तचर यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेतील काही व्यक्तींकडून असंतोष व्यक्त केला जात असल्याचा दावा त्यांनी केला. त्यांच्या मते, पूर्वी पूर्णपणे नियंत्रणात असलेल्या संस्था आता स्वतंत्रपणे विचार करू लागल्या असून सत्तेच्या विरोधात आवाज उठवत आहे.

### आणीबाणीची शक्यता व्यक्त


राहुल गांधी यांनी पुढे दावा केला की, लोकांमधील वाढता असंतोष दडपण्यासाठी सरकार कठोर पावले उचलू शकते. त्यांनी देशात आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यताही व्यक्त केली. त्यांच्या मते, जनतेचा दबाव वाढल्यास सत्ताधारी पक्ष परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचा प्रयत्न करू शकतो.

---

## सक्तीच्या मजुरीने तयार वस्तूंची आयात सुरूच असल्याने कारवाई

### भारतासह 54 देशांवर 12.5 टक्के टेरिफ!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**



अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधीने (यूएसटीआर) कलम ३०१ अंतर्गत भारतासह ५४ देशांवर १२.५ टक्के अतिरिक्त शुल्क (टेरिफ) लावण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. सक्तीच्या मजुरीतून तयार झालेल्या वस्तूंच्या आयातीवर बंदी घालण्यात या देशांना अपयश आले आहे. या बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यातही त्यांनी कुचराई केली आहे, असा आरोप करण्यात आला आहे. यूएसटीआरने ६० देशांच्या चौकशीनंतर हा प्रस्ताव तयार केला आहे. मात्र, भारताने हे आरोप फेटाळून लावले आहेत. तसेच, ही चौकशी थांबवण्याची मागणी केली आहे.

या ५४ देशांमध्ये भारताव्यतिरिक्त चीन, जपान, ब्राझील, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन, सौदी अरेबिया आदी देशांचा समावेश आहे. ज्या देशांमध्ये सक्तीच्या मजुरीतून तयार झालेल्या वस्तूंच्या आयातीवर बंदी आहे किंवा ज्यांनी ती लागू करण्याचे आश्वासन दिले आहे, त्यांच्यावर केवळ १० टक्के अतिरिक्त शुल्क आकारले जाईल, असे यूएसटीआरने म्हटले आहे. अमेरिकी व्यापार कायद्यात कलम ३०१ काय आहे? अमेरिकी व्यापार कायद्यातील ही अतिशय आक्रमक कायदेशीर तरतूद आहे. याच्या मदतीने अमेरिका कोणत्याही देशावर मनमानी निर्बंध किंवा भारी आयात शुल्क लावू शकते. हे शुल्क लागू झाले, तर भारताचा कापड उद्योग, ॲल्युमिनियम, कापूस, सी-फूड, कॉफी आणि तांदूळ अमेरिकेत महाग होतील. मात्र, भारतीय औषधे यातून वगळण्यात आली आहेत.

## द्रमुकचा इंडिया आघाडीला झटका!

**चेन्नई :** तमिळनाडूमध्ये थलपती विजय यांच्या सरकारमध्ये काँग्रेस सामील झाल्यानंतर, डीएमकेने विरोधी पक्षांच्या ऐक्याला मोठा धक्का दिला आहे. ८ जून रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या 'इंडिया' आघाडीच्या बैठकीपासून डीएमकेने अंतर राखले आहे. निवडणूक निकालानंतर काँग्रेसने डीएमकेसोबत जो विश्वासघात केला, त्यामुळे पक्षाचे कार्यकर्ते अजूनही प्रचंड दुखावलेले आहेत, अशी भूमिका पक्षाने घेतली आहे.

गेल्या महिन्यात जाहीर झालेल्या तमिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या निकालात विजय यांच्या 'टीव्हीके' पक्षाने चमकदार कामगिरी करत १०८ जागा जिंकल्या, ज्यामुळे डीएमकेला आपली सत्ता गमवावी लागली. यानंतर काँग्रेसने सर्वात आधी टीव्हीकेला पाठिंबा देण्याची घोषणा केली. त्यानंतर डाव्या पक्षांसह इतर छोट्या पक्षांनी आणि एआयएडीएमकेच्या आमदारांनीही विजय यांच्या बाजूने मतदान केले. काँग्रेस हा दीर्घकाळापासून डीएमकेचा मित्रपक्ष राहिला आहे, अगदी राहुल गांधी डीएमके प्रमुख एम. के. स्टॅलिन यांना आपला भाऊ मानत असत.

## अखेर मान्सून भारतात दाखल; केरळमध्ये जोरदार पाऊस

**मुंबई/वृत्तसंस्था**

बऱ्याच प्रतीक्षेनंतर भारतात मान्सूनचे आगमन झाले आहे. नैऋत्य मान्सून केरळमध्ये दाखल झाला आहे, असे भारतीय हवामान विभागाने गुरुवारी जाहीर केले. दक्षिण भारतातील या राज्यात बऱ्याच काळापासून पाऊस सुरू होता, पण आता याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. विशेष म्हणजे राज्यात १ जूनला मान्सूनचे आगमन होणार होते.

हवामान विभागाने सुरुवातीला असा अंदाज वर्तवला होता की, केरळमध्ये मान्सून २६ मे पर्यंत दाखल होऊ शकतो. तेव्हा चार दिवसांचा विलंब किंवा लवकर आगमन होण्याचाही अंदाज वर्तवला होता. पावसाळा ३० मे पर्यंत सुरू होऊ शकतो अशी शक्यता वर्तवली होती. तरीही मान्सूनला विलंब झाला. इतकेच नव्हे तर मान्सून नेहमीच्या १ जूनच्या तारखेला दाखल झाला नाही, त्यामुळे पावसाला चार दिवसांचा उशीर झाला.

गुरुवारी सकाळी केरळच्या अनेक जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला होता. त्यात अलप्पुझा, कोट्टायम आणि एर्नाकुलम जिल्ह्यांचा समावेश होता. राज्यातील काही भागात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस आणि वेगवान वारे वाहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तिरुवनंतपुरम, कोल्लम, पत्तनमथिट्टा, इडुक्की आणि त्रिशूर जिल्ह्यात पावसाच्या सौम्य ते मध्यम सरी कोसळण्याचा अंदाज आहे.

केरळसह तामिळनाडू आणि कर्नाटकच्या अनेक जिल्ह्यात पुढील सात दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. केरळच्या अनेक भागात आधीच जोरदार पाऊस सुरू आहे. ओडिशा, राजस्थान, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, दिल्ली, तेलंगणासह २४ राज्यांमध्ये पाऊस आणि वेगवान वारे वाहतील असे हवामान खात्याने सतर्क केले आहे. हवामानातील बदलामुळे आजही गुजरात, पश्चिम राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्रातील अनेक भागात तापमान ४० डिग्री सेल्सिअसपुढे आहे.

---

## महायुतीच्या १७ पैकी सहा जागा अविरोध; महाविकास आघाडीला धक्का

**मुंबई/वृत्तसंस्था**



राज्यात विधान परिषदेच्या निवडणुका सुरू आहेत. विधान परिषदेसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे, पण मतदानाआधीच मोठा खेळ झाल्याचे पाहायला मिळत आहे. महायुतीचे तब्बल सहा उमेदवार अविरोध निवडून आल्याची माहिती समोर आली आहे. राज्यात १७ जागांसाठी निवडणूक होणार असून गुरूवारी अर्ज माघारीची शेवटची मुदत होती. अनेक ठिकाणी बंडखोरीही झाली होती. महायुतीला बंडखोरी रोखण्यात यश आले असून महाविकास आघाडीला आठ ठिकाणी झटका बसला आहे.

महायुतीला १७ जागांपैकी सहा जागा या बिनविरोध करण्यात यश आले आहे. यामध्ये ठाणे मतदारसंघात रवींद्र फाटक, कोकण मतदारसंघात अनिकेत तटकरे, यवतमाळ, वर्धा- गडचिरोली- चंद्रपूर मतदारसंघात भाजपाचे अरुण लखाणी, पुणे मतदारसंघात विक्रम काकडे आणि अहिल्यानगर मतदारसंघात भाजपचे प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड झाल्याची माहिती समोर आली आहे. महायुतीने या सहा जागांवर बिनविरोध विजय मिळवत महाविकास आघाडीला धक्का दिला आहे.

नाशिकमधील राजकीय वातावरण तापले असून, अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांच्या उमेदवारी अर्जाच्या माघारीवरून शेवटच्या क्षणापर्यंत नाट्य पाहायला मिळाले. गोकुळ गीते यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घ्यावा, यासाठी महायुतीच्या नेत्यांकडून शेवटच्या मिनिटापर्यंत शर्थीचे प्रयत्न सुरू होते. मात्र, एका वादग्रस्त ऑडिओ क्लिपमुळे हा संपूर्ण निर्णय फिरल्याचा खळबळजनक दावा आता गिरीश महाजन यांचे निकटवर्तीय निलेश बोरा आणि नाना गामने यांनी केला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# डेटिंग ॲपवर ओळख, समलिंगी संबंधांसाठी तरुण रुमवर पोहोचला, तिथे सात जण आधीच बसलेले

■ गांधीनगर/वृत्तसंस्था

समलिंगी संबंधांच्या इच्छेतून गुजरातमधील सुरेंद्रनगरमधील येथे भयावह घटना घडल्याचे उघडकीस आले आहे. एका तरुणाने 'गे-डेटिंग ॲप' डाऊनलोड केले, काही लोकांशी चॅटिंग करत मैत्री केली. त्यानंतर भेटण्याचे ठरले. सुरुवातीला हे एखाद्या रोमँटिक भेटीसारखेच वाटत होते, पण ठरलेल्या ठिकाणी पोहोचल्यावर रुममध्ये सात जण वाट पाहत असल्याचे त्याला आढळले. आपण एखाद्या 'डेट'वर नसून एका सापळ्यात अडकलो आहोत, याची त्याला जाणीव झाली. काही मिनिटांतच त्याचे खाजगी फोटो आणि व्हिडिओ रेकॉर्ड करुन ब्लॅकमेलिंगचा खेळ सुरु झाला. सुरेंद्रनगर जिल्ह्यातील लखतर तालुक्यातील एका तरुणाने समलिंगी व्यक्तींसाठी असलेले एक डेटिंग ॲप डाऊनलोड केले होते. या



प्लॅटफॉर्मवर त्याने काही व्यक्तींशी संवाद साधण्यास सुरुवात केली; या संवादांचे रुपांतर हळूहळू मैत्रीत झाले. अखेरीस समोरच्या व्यक्तींनी त्याला सुरेंद्रनगरमध्ये भेटण्यासाठी बोलावले. समलिंगी संबंधांच्या आशेने तो तरुण ठरलेल्या ठिकाणी पोहोचला.भेटीचे ठिकाण सुरेंद्रनगर मेडिकल कॉलेजच्या मागील बाजूस असलेले एक निर्जन घर होते. पोलिसांच्या माहितीनुसार, तिथे आधीच सात जण उपस्थित होते. तो तरुण तिथे पोहोचताच त्याला त्या सर्वांनी वेढा घातला. आरोपींनी त्याला मारहाण करत धमकावून त्याचे खाजगी फोटो व व्हिडिओ रेकॉर्ड केले. त्यानंतर हे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन त्यांनी त्याच्याकडून ३१००० रुपये रोख उकळले.त्याने या प्रकाराबद्दल कोणाला काही सांगितले किंवा पोलिसांशी संपर्क साधला, तर त्याचे खाजगी फोटो आणि व्हिडिओ सार्वजनिक केले जातील, अशी धमकी त्या तरुणाला देण्यात आली होती. अशा परिस्थितीत बदनामीच्या भीतीने अनेक जण घाबरुन तक्रार करणे टाळतात; मात्र या प्रकरणात पीडित तरुणाने धिराने पाऊल उचलत थेट पोलिसांशी संपर्क साधला.तक्रार प्राप्त होताच सुरेंद्रनगर शहर 'ए' विभागाच्या पोलिसांनी तातडीने तपासाला सुरुवात केली. तांत्रिक पुरावे आणि खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, पोलिसांनी अवघ्या काही तासांतच या संपूर्ण टोळीचा शोध लावला. या कारवाईदरम्यान पोलिसांनी सात आरोपींना अटक केली. साहिल चौहान, शक्ती बाजीपारा, भार्गव परमार, समीर कोडिया, फरदीन शेख, समीर दिवाण आणि अंकित त्यागी अशी त्यांची नावे आहेत. तसेच पोलिसांनी आरोपींकडून पीडित व्यक्तीकडून उकळलेली रक्कमही हस्तगत केली.तपासादरम्यान पोलिसांना असे आढळून आले की, अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी एक असलेल्या शक्ती बाजीपाराचा अशाच प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये यापूर्वीही सहभाग होता; त्याच्यावर 'हनी-ट्रॅप'शी संबंधित दोन गंभीर गुन्हे आधीच दाखल आहेत. ही टोळी बऱ्याच काळापासून सोशल मीडिया आणि डेटिंग ॲप्सच्या माध्यमातून लोकांना लक्ष्य करत असावी, असा पोलिसांना संशय आहे. त्यामुळे, या टोळीचे आणखी कोणी बळी ठरले आहेत का, याचा तपास पोलीस करत आहेत. जिल्हा पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, जर कोणी या टोळीचा—किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या ऑनलाइन ब्लॅकमेलिंग, 'हनी-ट्रॅप' किंवा डेटिंग ॲपवरील फसवणुकीचा—बळी ठरले असेल, तर त्यांनी न घाबरता पुढे येऊन तक्रार नोंदवावी.

## लग्नासाठी 14 कोटींचा महाल बूक; होणाऱ्या पत्नीसोबत लोहगडावर ट्रेकिंग, पुण्यातील तरुणाचा वेदनादायी शेवट

■ लोणावळा/वृत्तसंस्था

नियोजित पत्नीच्या वाढदिवसानिमित्त मावळातील लोहगड किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेलेल्या तरुणाचा सुमारे चारशे फूट खोल दरीत पडून दुर्दैवी मृत्यू झाला. लग्नाची गाठ बांधण्यापूर्वीच मृत्यूने गाठल्याने हळहळ व्यक्त होत आहे. ही घटना गुरुवारी सकाळी साडेदहा वाजता घडली. केतन विशाल अग्रवाल (वय २६, लोढा बेलमोंडो सोसायटी, गहुंजे, ता. मावळ) असे दरीत पडून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.केतनच्या मागे आई, वडील, बहीण, दोन चुलते, दोन चुलतभाऊ असा परिवार आहे. वडील विशाल अग्रवाल हे प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक असून, केतनदेखील बांधकाम व्यावसायिक होता. नियोजित पत्नीच्या वाढदिवसानिमित्त दोघे लोहगडावर ट्रेकिंगला गेले होते. त्यांचे लग्न उदयपूर, राजस्थान येथे होणार होते; परंतु लग्नाची तारीख अंतिम झाली नव्हती.लोणावळा ग्रामीण पोलिस निरीक्षक दिनेश तायडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी केतन हा त्याच्या नियोजित पत्नीसह कारने लोहगड येथे आला होता. यानंतर दोघांनी ट्रेकिंगला सुरुवात केली. ट्रेकिंग करीत असताना गडावरील एका कड्यावरून अचानक केतनचा तोल गेला आणि तो चारशे फूट खोल दरीत पडला. गंभीर जखमी झाल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच लोणावळा ग्रामीण पोलिस निरीक्षक दिनेश तायडे, पोलिस कर्मचारी पवन कराड, जय पवार, प्रशांत तुरे, प्रणय उकिरडे यांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची पाहणी केली.पोलिसांनी या घटनेची माहिती लोणावळ्यातील शिवदुर्ग मित्र आपत्कालीन पथकाला कळविली.



घटनेची माहिती मिळताच शिवदुर्ग मित्र आपत्कालीन पथक घटनास्थळी दाखल झाले. पथकातील सदस्यांनी तीन तासांच्या परिश्रमानंतर केतनची बॉडी लोहगड परिसरातील घनदाट झाडीतून बाहेर काढून गडाच्या पायथ्याशी आणली. सायंकाळी उशिरा केतनच्या पार्थिवावर निगडी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार झाले.केतनच्या लग्नाची तयारी दोन्ही कुटुंबीयांकडून जोरदारपणे सुरू होती. लग्नासाठी उदयपूर येथे १४ कोटी रुपये खर्चून कुटुंबीयांनी एक आलिशान महाल बुक केला होता; तसेच उदयपूरला जाण्यासाठी दोन स्वतंत्र विमानांचे बुकिंगदेखील करण्यात आले होते. अतिशय ग्रँड विवाह सोहळा साजरा करण्याची दोन्ही कुटुंबांत तयारी सुरू असताना नियतीच्या मनात मात्र काही वेगळेच होते. केतनच्या अचानक जाण्याने दोन्ही कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे.

## कॉन्स्टेबलचा भीषण अपघातात मृत्यू

■ सातारा/वृत्तसंस्था

सातारा जिल्हा पोलीस दलावर शोककळा पसरवणारी दुर्दैवी घटना सातारा-वाई मार्गावर शुक्रवारी पहाटे घडली आहे. कार झाडावर आदळून झालेल्या भीषण अपघातात वाई पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस कॉन्स्टेबल जागीच ठार झाला, तर त्यांची पत्नी गंभीररित्या जखमी झाली आहे. श्रावण राठोड, असे मृत पोलीस कॉन्स्टेबलचे नाव आहे. आजारी आईच्या उपचारासाठी डॉक्टरांची अपॉइंटमेंट घेण्याकरिता साताऱ्याला जात असताना वाटेतच काळाने त्यांना गाठले.आजारी आईवर उपचाराचा सल्ला घेण्यासाठी श्रावण राठोड हे पहाटे पत्नीसह कारमधून साताऱ्याकडे जात असताना वाकेश्वर-बावधन गावच्या हद्दीत शुक्रवारी पहाटे अपघाताची दुर्दैवी घटना घडली. अपघातात मृत्यू झालेले श्रावण राठोड हे मूळचे हिंगोली जिल्ह्यातील आहेत. अपघातात त्यांच्या पत्नी देखील गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर साताऱ्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.साताऱ्याकडे जात असताना अज्ञात वाहनाने हुलकावणी दिल्याने श्रावण राठोड यांचे आपल्या कारवरील नियंत्रण सुटले आणि गाडी थेट रस्त्याकडेच्या झाडावर जाऊन आदळली. हा अपघात इतका भीषण होता की कारच्या पुढील दर्शनी भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. श्रावण राठोड जागीच ठार झाले तर पत्नीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांच्यावर साताऱ्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, श्रावण राठोड हे वाई पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेत कार्यरत होते. गुन्ह्यांची उकल करण्यात त्यांचा हातखंडा होता. नुकताच गंभीर प्रकरणातील आरोपी त्यांनी पकडला होता. त्यांचा अपघात आहे की घातपात, याची चौकशी करण्याची मागणी वाईमधील नागरिकांनी केली आहे. दरम्यान, शवविच्छेदनानंतर श्रावण राठोड यांचे पार्थिव वाई पोलीस ठाण्यात आणल्यानंतर सहकाऱ्यांना आपले अश्रू आवरता आले नाहीत. साश्रुनयनांनी सहकाऱ्यांनी त्यांना मानवंदना दिली. त्यानंतर पार्थिव हिंगोली जिल्ह्यातील त्यांच्या मूळ गावाकडे नेण्यात आले.

## मिसिंग लिंकच्या पुलावर 3 गाड्यांची धडक, तर जुन्या महामार्गावर 6 गाड्यांचा अपघात

■ रायगड/वृत्तसंस्था

मुंबई-पुणे महामार्गावर मिसिंग लिंकच्या पुलावर आज तीन वाहनांचा विचित्र अपघात घडला. तसेच जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर 6 वाहनांचा विचित्र अपघात झाला आहे. या दोन्ही अपघातांमध्ये वाहनांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या दोन्ही घटनांनंतरचे व्हिडीओदेखील सोशल मीडियावर समोर आले आहेत. मिसिंग लिंकवरच्या अपघाताचे दृश्य हे काळजाचा थरकाप उडवणारे आहेत. या अपघातात एक कार दुसऱ्या कारवर आदळली आहे. एका कारच्या थेट बोनेटवर दुसरी कार आहे. यामुळे वाहनांचे तर नुकसान झाले आहेच, पण या घटनेमुळे वाहनातील प्रवाशांनादेखील मोठा मानसिक धक्का बसला असेल. पण सुदैवाने या दुर्घटनेत कुणी जखमी झालेले नाही. पण वाहनांचे नुकसान झाले आहे.मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग आणि जुना मुंबई-पुणे महामार्ग या दोन्ही महत्त्वाच्या मार्गांवर बुधवारी 17 जून रोजी 2 वेगवेगळे मात्र विचित्र अपघात घडल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे या 2 अपघातांमध्ये मिळून एकूण 9 वाहनांचे नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना व्यक्त होत आहे.मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील नव्याने सुरू करण्यात आलेल्या कनेक्टिंग लिंक प्रकल्पावरील पुलावर ३ कारची साखळी टक्कर झाली. मुंबईहून पुण्याकडे जाणारी फोर्च्युनर कारने अचानक लेन बदलत ब्रेक लावल्याने मागून येणाऱ्या वेरणा कारने तिला धडक दिली. त्यानंतर वेरणाच्या मागून येणाऱ्या एक्सयूव्ही कारनेही जोरदार धडक दिल्याने ३ वाहनांचा विचित्र अपघात घडला. या अपघातात तिन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र वाहनांतील प्रवासी सुखरूप बचावले. बोरघाट महामार्ग पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत वाहने रस्त्यावरून बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.दुसरीकडे, चौकजवळील वावंढळ हद्दीत जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर 6 वाहनांचा साखळी अपघात झाला. आयशर टेम्पोचे ॲक्सेल तुटल्याने वाहन रस्त्यावर उभे होते. चालक मागून येणाऱ्या वाहनांना सावधगिरीचा इशारा देत असताना वाहतूक संथ गतीने सुरू होती. याच वेळी भरधाव कंटेनर चालकाचे वाहनावरील नियंत्रण



सुटल्याने त्याने एसटी बस आणि टेम्पोला धडक दिली. त्यातून पुढील मारुती कार, छोटा हत्ती टेम्पोसह अन्य वाहने एकमेकांवर आदळली. या अपघातात काही जण किरकोळ जखमी झाले आहेत. तसेच वाहनांचे नुकसान झाले आहे. मात्र कोणतीही जीवितहानी झाली नसल्याने साऱ्यांनीच सुटकेचा निश्वास सोडला.

# BCCIकडून कारवाई होणार नसल्याचं स्पष्ट, उलट श्रीलंका बोर्डाचं नाव घेत काय म्हणाले?

**मुंबई/वृत्तसंस्था**



श्रीलंकेमध्ये सुरू असलेल्या मालिकेत खराब फॉर्मसह मैदानात झालेल्या राड्यामुळे वैभव सूर्यवंशी चर्चेत आहे. डिवचल्यावर बेबी बॉसने श्रीलंकेच्या खेळाडू धक्काबुक्की केली होती. आयपीएलमध्ये सर्वांना बॅटने फोडून काढणारा वैभव हाताने फोडतो की काय असे वाटले होते. मात्र पठ्ठ्याला सर्वांना आवरलं, या वर्तनामुळे त्याच्यावर कारवाई होणार अशी चर्चा होत होती. अशातच वैभवसह त्याच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आली आहे. या घडलेल्या प्रकारावर बोलताना बीसीसीआयने कारवाईबाबत बोलताना असं काही होणार नसून ते आमच्या अधिकार क्षेत्रात येत नसल्याचं सांगितलं आहे.बीसीसीआय कारवाई घेण्याचा विचार करत आहे अशा खूप गोष्टी चालू आहेत, पण बीसीसीआयला कोणताही अधिकार नाही. या प्रकरणात मॅच रेफरी आणि पंच खरा निर्णय घेतात, त्यामुळे ते यावर निर्णय घेतील. बीसीसीआयचा यात काही रोल नाही. ही ट्राय सीरिज श्रीलंका क्रिकेट बोर्डाच्या अधिकारक्षेत्रात येते. त्यामुळे बीसीसीआय आणि आयसीसीचा याच्याशी काही संबंधच नाही, असं बीसीसीआय सचिव देवजित सैकिया यांनी सांगितलं.श्रीलंका अ संघासोबत झालेल्या सामन्यात मोठा वाद पाहायला मिळाला होता. सुपर ओव्हरपर्यंत रंगलेला सामना हा अंधारात खेळवला गेला होता. त्यासोबत वादग्रस्त निर्णय, शेवटी भारताचा पराभव झाल्याने श्रीलंकन खेळाडूंनी वैभवला डिवचले. त्यानंतर तो भडकला आणि त्यांच्या खेळाडूच्या अंगावर जात त्याने धक्का दिला होता. त्यामुळे वैभववर बीसीसीआय कारवाई करणार का? याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. मात्र असे काही झाले नाही. त्यामुळे वैभव फायनल सामना खेळणार हे आता स्पष्ट झाले आहे.गोलंदाजांच्या भरीव योगदानामुळे भारतीय 'अ' संघाने बुधवारी अफगाणिस्तान 'अ' संघावर १०१ फलंदाज आणि धावांनी मोठा विजय मिळवत तिरंगी वनडे क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. या विजयासह भारत 'अ' संघाने चार गुण तसेच सर्वोत्तम निव्वळ धावगतीसह (०.५९७) गुणक्रमवारीत अव्वल स्थानी झेप घेतली. शुक्रवारी दाम्बुला येथेच श्रीलंका 'अ' विरुद्ध अफगाणिस्तान 'अ' हा अखेरचा गटसामना होईल. अंतिम फेरीसाठी अफगाणिस्तानला यजमान श्रीलंकेवर मोठ्या विजयाची आवश्यकता आहे. अखेरच्या साखळी लढतीत काहीही निकाल लागला तरी भारत 'अ' संघ पहिल्या दोन संघांत राहणार हे निश्चित आहे.

## भारतीय महिलांची आता खरी परीक्षा, सेमी फायनलसाठी 2 विजय आवश्यक

**मुंबई/वृत्तसंस्था**

हरमनप्रीत कौरच्या भारताने नवख्या नेदरलँड्सचा ९५ धावांनी धुव्वा उडवत 'अ' गटात अव्वल क्रमांकावर झेप घेतली आहे. ढगाळ वातावरणात प्रथम फलंदाजी करतानाही स्मृती मानधना आणि शेफाली वर्मा यांनी दमदार अर्धशतके झळकावून डावाची पायाभरणी केली. यामुळे स्पर्धेतील आपली सर्वोच्च ५ बाद २०९ ही धावसंख्या उभारण्यात टीम इंडियाला यश लाभले. सुरुवातीचे दोन्ही सामना रंगीत तालीम असल्यासारखे होते. पण आता खरी परीक्षा असणार आहे. महिला भारतीय संघाचे पुढील तीन सामने कोणत्या संघासोबत असणार आहेत जाणून घ्या.महिला भारतीय संघाचे पुढील सामने दक्षिण आफ्रिक, बांगलादेश आणि तगड्या ऑस्ट्रेलियासोबत असणार आहे. पहिले दोन सामने फार काही कठीण नव्हतेच पण २१ तारखेचा दक्षिण आफ्रिकेसोबतच सामना महत्त्वाचा आहे. भारतीय संघाला सेमी फायनलमध्ये आपली जागा पक्की करण्यासाठी किमान दोन सामन्यात विजय हा मिळवावाच लागणार आहे. जर भारत यामध्ये अपयशी ठरला तर अडचणींचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.भारतीय संघाची दक्षिण आफ्रिका आणि बांगलादेशविरूद्ध कामगिरी चांगली आहे. पण ऑस्ट्रेलियाविरूद्ध हेड टू हेड कामगिरी पाहिली तर ५-२ ने आपण मागे आहोत. त्यामुळे तीनपैका दोन सामन्यात विजय मिळवणं महत्त्वाचं आहे. भारताने २१ तारखेचा दक्षिण आफ्रिका आणि २५ तारखेचा बांगलादेशविरूद्धच्या सामना जिंकला तर सेमी फायनलमधील भारताचे स्थान जवळपास निश्चित होईल. मात्र दोन पराभव झाले तर इतर संघाच्या निकालांवर अवलंबून रहावे लागणार आहेफलंदाज आणि गोलंदाजांच्या पूरक कामगिरीत श्रेयंका पाटील हिची दुखापत मात्र टीम इंडियाच्या चिंतेत भर घालू शकते. घोट्याला दुखापत झाल्यामुळे तिला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर न्यावे लागले. भारतासाठी श्रेयंका दुखापतीमधून सावरणं गरजेचं आहे. सुरुवातीला नेदरलँड्सच्या निष्प्रभमाऱ्याचा फायदा घेत सलामीच्या फलंदाजांनी खोऱ्याने धावा जमवल्या. पॉवरप्लेनंतर मात्र खेळ थोडा मंदावला तरीदेखील भारताने ११५ धावांची सलामी दिली. शेफाली आपले अर्धशतक पूर्ण करून बाद झाली.

## गंभीरला कोचपदावरून काढा आणि धोनीला मेंटॉर करा

**मुंबई :** भारतीय क्रिकेट संघाचा माजी वेगवान गोलंदाज एस श्रीसंत चर्चेत आला आहे. टीम इंडियाचे हेड कोच गौतम गंभीरला हटवण्याची मागणी करत माजी खेळाडू महेंद्रसिंह धोनीसारख्याला संघाचा मेंटॉर करावं असं श्रीसंतने म्हटलं आहे. एका चॅनेलला दिलेल्या मुलाखतीमध्ये श्रीसंत याने आपली प्रतिक्रिया दिली आहे.या मुलाखती दरम्यान श्रीसंतला विचारलं गेलं की भारतीय संघ घरच्याच मैदानावर न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका संघाविरुद्ध संघर्ष करत होता, यावर बोलताना, कोच बदलून टाका, भारतीय संघाला कोच नाही तर मेंटॉरची गरज आहे. कोणी काही म्हणू दे पण धोनीची मानसिकता आणि आपल्या खेळाडूंवर त्यांनी दाखवलेला विश्वास हाच त्याच्या यशस्वी होण्याचा खरा मंत्र आहे. खेळाडू वर्ल्ड कप जिंकतात कोच नाही. कर मैदानामध्ये खेळाडू घाम गाळत असतात त्याच्यामुळे त्याचा श्रेय त्यांनाच मिळाले पाहिजे, असं श्रीसंत याने म्हटल आहे. जर तुम्ही यंदाचा वर्ल्ड कप पाहिला तर संजू सॅमसंग याने चांगलं प्रदर्शन नसतं केलं किंवा सूर्यकुमार यादव यांनी आपल्या नेतृत्वात योग्य निर्णय नसते घेतले तर आपण जिंकलो असतो का? त्यावेळी मैदानातील सर्व निर्णय हे कोच घेत असतो का? असा प्रश्न उपस्थित करत गंभीरवर निशाणा साधला.

## हरभजन दम असेल तर रिंगमध्ये उतर'; श्रीसंतच्या चॅलेंजला भज्जीचे उत्तर

**मुंबई/वृत्तसंस्था**

भारताचा माजी क्रिकेटपटू एस श्रीसंत याने मुलाखतीमध्ये केलेल्या विधानांची सर्वत्र चर्चा होताना दिसत आहे. भारतीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक असलेल्या गौतम गंभीर याला हटवा, त्याऐवजी धोनीसारख्याला मेंटॉर करा असं श्रीसंत म्हणाला होता. त्यासोबतच त्याने यावेळी थप्पडकांडच्या विषयावर बोलताना हरभजन सिंग याला थेट रिंगमध्ये उतरण्याचे चॅलेंज दिले होते. सोशल मीडियावर सर्वत्र चर्चा असताना आता भज्जीने रिप्लाय केला आहे. हरभजन सिंगने थेट श्रीसंतचे नाव घेतले नाही पण त्याचा रोख आणि त्याने म्हटलेल्या कवितांच्या ओळींमधून याचा तुम्हाला नक्कीच अंदाज येईल.१८ वर्षांपूर्वी झालेला थप्पडकांड आता पुन्हा एकदा चर्चेत आलाय. कारण श्रीसंतला यावरून विचारल्यावर त्याने थेट भज्जीवर टीका केली. जाहिरातीत हरभजनने नाव न घेता IPL मधील 'थप्पड कांड'ची खिल्ली उडवली. आयुष्यातील वेदनादायी प्रसंगाचा वापर करून पैसे कमवले. मी तेव्हापासून त्याच्यासोबत असलेले सर्व संबंध तोडले, सोशल मीडियावर सगळीकडे ब्लॉक केल्याचं श्रीसंत म्हणाला होता. या वादग्रस्त जाहिरातीमधून हरभजने याने १ कोटी कमावल्याचा दावाही श्रीसंतने केलाय. यावेळी बोलताना श्रीसंत याने फक्त हरभजनलाच नाहीत गौतम गंभीरलाही रिंगमध्ये येण्यासाठी आव्हान दिले आहे.या मुलाखतीमध्ये श्रीसंतला जेव्हा त्याचा आणि भज्जीसोबतचा बॉक्सिंग करतानाचा एक जुना फोटो दाखवला. त्यावेळी त्याला राग आला आणि त्याने भज्जीला आव्हान देत, रिंगमध्ये ये तुझ्यात आहे का तेवढी हिंमत? हा काही ड्रामा नसून तुला उघडपणे आव्हान देत असल्याचं श्रीसंत म्हणाला. यावर हरभजन सिंग याचा रिप्लाय आला आहे.दरम्यान, हरभजनने इन्स्टाग्रामवर एका शायरीच्या व्हिडिओतून उत्तर दिलं आहे. त्याने काही नाव घेतलं नाही. 'किसी ने क्या खूब कहा है कि करने दो जो लोग बकवास करते हैं, हमेशा खाली बर्तन ही तो आवाज करते है', ही कवितेची ओळ म्हणाला. कोणीतरी खूप चांगलं म्हटलं आहे की, जे बकवास करत असतात त्यांना करूदे कारण नेहमी रिकामी भांडीच जास्त आवाज करत असतात, असं भज्जी म्हणाला. यावर आता श्रीसंत थेट बोलतो का हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.


# वर्ल्ड कपमध्ये भारताचा सलग दुसरा विजय, पण एका वाईट बातमीने वाढवली चिंता

**मुंबई/वृत्तसंस्था**



महिला टी-२० वर्ल्ड कप २०२६ मध्ये भारतीय संघाने नेदरलँड्स संघाचा ९५ धावांनी विजय मिळवला आहे. वर्ल्ड कपमधील भारतीय संघाचा सलग दुसरा विजय आहे. भारतीय संघाने पहिल्यांदा बॅटिंग करताना २०९-५ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना नेदरलंड्स संघाला ११४ वर ऑल आऊट केले. या सामन्यामध्ये स्मृती मानधनाने ४७ चेंडूत ७४ धावा करत स्पर्धेतील सलग दुसरी अर्धशतकी खेळी केली. मागील सामन्यामध्ये पहिल्या चेंडूवर षटकार मारणाऱ्या शफाली वर्माने ३८ चेंडूत ५५ धावा करत तीन विकेट नावावर केल्या. आजच्या सामन्यात मोठा विजय मिळवल्याने भारताला रनरेटमध्ये फायदा झाला असून ग्रुप ए मध्ये चार गुणांसह पहिल्या स्थानी झेप घेतली आहे. या सामन्यामध्ये भारताने विजय मिळवला असला तरी एक वाईट बातमी आली आहे. आजच्या सामन्यामध्ये भारतीय संघाने सांघिक कामगिरी करत विजय सोपा केला. स्मृती आणि शफाली यांनी ११५ धावांची भागीदारी केली. सुरूवातीला स्मृतीने वेळ घेतला त्यावेळी शफालीने आपले आक्रमण सुरू ठेवले होते. एकदा सेट झाल्यावर दोघींनीही नेदरलँड्सच्या गोलंदाजांचा घाम काढला. नेदरलँड्स संघ बॅटिंग करत असताना कर्णधार बाबेट डी लीड हिने सर्वाधिक २८ धावांची खेळी केली, मात्र इतर कोणालाही भारतीय खेळाडूंनी टिकू दिले नाही. भारताकडून श्री चरणीने सर्वाधिक ४ विकेट नावावर केल्या. या ४ विकेट घेत श्री चरणी वर्ल्ड कपमधील सर्वाधिक विकेट घेणारी गोलंदाज आहे. तर दुसऱ्या स्थानी दीप्ती शर्मा असून तिने ६ विकेट घेतल्या आहेत.आजच्या सामन्यामध्ये भारताची अष्टपैलू खेळाडू श्रेयंका पाटील दुखापती झाली आहे. भारताच्या मुख्य गोलंदाजांपैकी एक असून आत्मविश्वासाने ती स्पिन गोलंदाजी करते. मात्र आजच्या सामन्यात फील्डिंगवेळी पाय मुडपल्याने ती जागेवरच बसली. तिला स्वतःच्या पायावरही बाहेर जाता आले नाही. तिच्या दुखापतीबद्दल काही अपडेट आली नाही. पण आता इथून पुढे भारताचे महत्त्वाचे सामने आहे. श्रेयंकाच्या ४ ओव्हर्स या संघासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. दरम्यान, भारतीय संघाने आजच्या सामन्यात २०९-५ धावा करत वर्ल्ड कप इतिहासामध्ये पहिल्यांदाच २०० धावांचा टप्पा पार केला. वर्ल्ड कपमध्ये इंग्लंडनंतर अशी कामगिरी भारत हा दुसरा देश आहे. त्यासोबतच स्मृती मानधना हिने सर्वाधिक ६ अर्धशतके करत इतिहास रचला आहे.

# काकांनी वाईट नजरेनं पाहिलं, घाणरेडं बोलले; वयाच्या 13व्या वर्षी घडलेला प्रकार सांगितला



स्टार प्लसची लोकप्रिय मालिका 'दिया और बाती हम' मध्ये मीना बिंदानीची भूमिका साकारणारी अभिनेत्री कनिका माहेश्वरी सध्या चर्चेत आहे. मालिकेतील तिच्या भूमिकेला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली आणि ती घराघरात ओळखली जाऊ लागली. अशातच आता, कनिकानं नुकत्याच एका मुलाखतीत तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल, करिअरबद्दल आणि तिला आलेल्या वाईट अनुभवांबद्दल सांगितलं आहे. हॉटरफ्लायला दिलेल्या मुलाखतीत कनिकानं तिच्या शाळेच्या दिवसांची आठवण सांगितली. वयाच्या १३ व्या वर्षी ती शाळेच्या बसमधून उतरून घरी जात असताना, एक काका तिच्याजवळ आले आणि त्यांनी पत्ता विचारला. ती पत्ता पाहत असतानाच, त्यांनी अश्लील इशारे केले, माझ्याकडे घाणेरड्या नजरेनं पाहिलं आणि काहीतरी घाणेरडं बोलले. तेव्हा कनिकानं त्यांना विचारलं, 'काका, तुम्ही असं का बोलत आहात?' त्यानंतर ते निघून गेले.कनिकानं पुढे सांगितलं की, त्या वयातही ती गप्प बसली नाही, कारण तिच्या आई-वडिलांनी तिला सांगितलं होतं की, जर कोणी तिच्याशी नीट बोललं नाही, तर तिनं त्याला प्रत्युत्तर दिलं पाहिजे. त्यामुळेच या कठीण काळातही ती स्वतःसाठी आवाज उठवू शकली. जेव्हा अभिनेत्री घरी आली आणि तिनं तिच्या आईला याबद्दल सांगितलं, तेव्हा तिची आई तिला रोज बस स्टॉपवरून आणायला जाऊ लागली.याशिवाय, महिलांच्या कपड्यांबद्दल बोलताना कनिका म्हणाली की, जेव्हा मुली तोकडे कपडे घालतात, तेव्हा लोक त्यांना दोष देतात आणि म्हणतात की, असे कपडे घातल्यानंतर लोक त्यांच्याकडे नक्कीच पाहतील. आपल्या आवडीचे कपडे मोकळेपणानं घालणं देखील खूप कठीण आहे.अभिनेत्रीनं तिच्या 'दिया और बाती हम' या मालिकेशी संबंधित एक किस्सा देखील सांगितला. कनिका म्हणाली की, 'नच बलिये' करत असताना तिला सांगण्यात आलं होतं की, ती सुनेची भूमिका साकारत असल्यामुळे तिला मालिकेसाठी कोणतेही छोटे कपडे घालण्याची परवानगी दिली जाणार नाही. मात्र, एकदा ती शॉर्ट्स घालून घरातून बाहेर पडली आणि काही लोकांनी तिला पाहून विचारलं, 'तुला लाज वाटत नाही का? तुझ्या नवऱ्याला सांगू का?'दरम्यान, कनिका माहेश्वरीनं २००१ मध्ये तिच्या करिअरला सुरुवात केली. तिनं 'कभी आये ना जुदाई' मधून मालिकाविश्वात पदार्पण केलं. मात्र, तिला खरी ओळख 'दिया और बाती हम' मालिकेनं मिळाली. यानंतर कनिका 'तू सूरज में सांझ पियाजी', 'राजा की आयेगी बारात', 'दिल दिया गल्ला', 'विरासत', 'कहानी घर घर की', आणि 'लव्ह का तडका' सारख्या मालिकांमध्ये दिसली आहे.

## अल्लू अर्जुनच्या अडचणी वाढल्या

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीचा सुपरस्टार अल्लू अर्जुन याच्या अडचणीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. हैदराबादमधील प्रसिद्ध 'संध्या थिएटर'बाहेर झालेल्या भीषण चेंगराचेंगरी प्रकरणात नामपल्ली न्यायालयानं अल्लू अर्जुनला समन्स बजावलं असून २२ जून रोजी कोर्टात प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाच्या पोलीस आरोपपत्रात अल्लू अर्जुनला 'आरोपी क्रमांक ११' करण्यात आलं आहे.हे प्रकरण दोन वर्षे जुनं आगे. ४ डिसेंबर २०२४ रोजी हैदराबादमधील संध्या थिएटरमध्ये अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २: द रूल' या बहुप्रतीक्षित चित्रपटाच्या प्रीमियर शोचं आयोजन करण्यात आलं होतं. आपल्या आवडत्या अभिनेत्याला पाहण्यासाठी थिएटरबाहेर चाहत्यांनी प्रचंड गर्दी केली होती. अल्लू अर्जुन जेव्हा गाडीच्या सनरुफमधून चाहत्यांना हात दाखवण्यासाठी बाहेर आला, तेव्हा गर्दी अनियंत्रित झाली. या गोंधळात आणि चेंगराचेंगरीत रेवती नावाच्या एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर तिचा ९ वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाला होता. या घटनेनंतर संपूर्ण चित्रपटसृष्टीत आणि चाहत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली होती.



चिक्कडपल्ली पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून कोर्टात २३ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केलं आहे. आरोपी १ ते १०मध्ये संध्या थिएटरचे मालक, भागीदार आणि व्यवस्थापन कर्मचाऱ्यांचा यात समावेश आहे. पुरेशी सुरक्षा न ठेवणं आणि गर्दीचं अयोग्य नियोजन केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.पोलिसांच्या मते, कार्यक्रमासाठी प्रशासनाकडून योग्य परवानगी घेण्यात आली नव्हती. तसंच अभिनेत्याच्या आगमनामुळं गर्दी अनावर झाली, ज्याचं नियोजन करण्यात त्याचे वैयक्तिक सुरक्षा रक्षक आणि व्यवस्थापक अपयशी ठरले. न्यायालयानं आतापर्यंत या प्रकरणातील १९ आरोपींना समन्स जारी केलं आहे.

## रजनीकांत आणि बॉलिवूडचा सुपरस्टार ४० वर्षांनी एकत्र, 'जेलर २' मध्ये अभिनेत्याची खास भूमिका

दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील सुपरस्टार रजनीकांत आणि बॉलिवूडचा हृतिक रोशन हे दोन कलाकार लवकरच एकाच चित्रपटात झळकण्याची शक्यता असल्यानं चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे. ' जेलर २ ' या सिनेमात हृतिक रोशन पाहुण्या कलाकाराच्या रुपात दिसणार असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हृतिक २२ आणि २३ जून रोजी चेन्नई येथे 'जेलर २'चं चित्रीकरण करणार आहे. त्याच्या भूमिकेबाबत निर्मात्यांकडून अधिकृत माहिती देण्यात आलेली नसली तरी हा केवळ काही मिनिटांचा कॅमिओ नसेल, असं बोललं जात आहे.कथानकातील महत्त्वाच्या टप्प्यावर हृतिकचं पात्र समोर येईल आणि रजनीकांत साकारत असलेल्या टायगर मुथुवेल पांडियनला मदत करत कथेला नवं वळण देईल, अशी चर्चा आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 'जेलर २' मधील एका विशेष आणि महत्त्वाच्या भूमिकेसाठी आधी बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खान याच्याशी चर्चा सुरू होती. मात्र, शाहरुखच्या व्यग्र वेळापत्रकामुळं त्यानं या चित्रपटातून माघार घेतली. त्यानंतर निर्मात्यांनी हृतिक रोशनशी संपर्क साधला आणि हृतिकनं या भूमिकेसाठी लगेचच होकार दिला. हृतिकची ही भूमिका केवळ एक कॅमिओ असला तरी चित्रपटाच्या कथेला कलाटणी देणारी एक महत्त्वपूर्ण भूमिका असेल.रजनीकांत आणि हृतिक यांचं एकत्र येणं चाहत्यांसाठी विशेष ठरणार आहे. १९८६मध्ये प्रदर्शित झालेल्या 'भगवान दादा' सिनेमात बालकलाकार म्हणून हृतिक यानं रजनीकांत यांच्यासोबत काम केलं होतं. तब्बल



४० वर्षांनंतर दोघं पुन्हा एकाच चित्रपटात दिसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.एका कार्यक्रमात हृतिकनं रजनीकांत यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा देत म्हटलं होतं की, "मी लहान असताना जेव्हा शॉट चुकवायचो, तेव्हा माझे आजोबा (जे. ओमप्रकाश) ओरडतील या भीतीनं रजनी सर ती चूक स्वतःवर घ्यायचे आणि म्हणायचे की चूक माझ्यामुळे झाली. ते अत्यंत दयाळू आणि साधे आहेत.

या चित्रपटात रजनीकांत आणि हृतिक रोशन व्यतिरिक्त रम्या कृष्णन, विद्या बालन आणि एस. जे. सुर्या यांच्याही महत्त्वाच्या भूमिका असणार आहेत. दोन वेगवेगळ्या पिढ्यांचे आणि दोन वेगवेगळ्या सिनेसृष्टींचे हे महामेरू एकत्र आल्यामुळे 'जेलर २' बॉक्स ऑफिसवर नवा इतिहास रचणार यात शंका नाही.

# हाताला पकडून अभिनेत्रीला जवळ ओढलं, भर कार्यक्रमात दिग्दर्शकानं ओलांडल्या मर्यादा; नेटकऱ्यांचा संताप, Video व्हायरल...

दिग्दर्शक अनिल रविपुडी यांच्या आगामी चित्रपटाच्या लॉंचचा एक व्हिडिओ समोर आला असून त्यावरून ज्येष्ठ तेलुगू चित्रपट निर्माते के. राघवेंद्र राव यांना सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात ट्रोल केलं जात आहे. या व्हिडिओमध्ये ८४ वर्षीय राघवेंद्र राव अभिनेत्री कीर्ती सुरेश आणि कृती शेट्टी यांचे हात धरून त्यांना स्वतःकडे ओढताना दिसत आहेत. यावर सोशल मीडिया युजर्सनी संताप व्यक्त केला आहे.व्यंकटेश डग्गुबाटी, नंदामुरी कल्याणराम, कीर्ती सुरेश आणि कृती शेट्टी यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या आगामी चित्रपटाचा लॉंच सोहळा गुरुवारी हैदराबादमध्ये पार पडला. मुहूर्त सोहळ्याचा भाग म्हणून ओपनिंग शॉट दिग्दर्शित करण्यासाठी प्रसिद्ध दिग्दर्शक राघवेंद्र राव





यांना आमंत्रित करण्यात आलं होतं. निर्माते अल्लू अरविंद यांनी ओपनिंग क्लॅप दिला, तर निर्माते दिल राजू, सुरेश बाबू आणि तेलुगू चित्रपटसृष्टीतील अनेक सदस्य या कार्यक्रमाला उपस्थित होते. मात्र, या कार्यक्रमातील एक व्हिडिओ लगेच सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनला.व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये, राघवेंद्र राव शॉटसाठी कलाकारांना योग्य स्थितीत उभे करताना दिसत आहेत. सुरुवातीला, ते कीर्ती सुरेशचा हात धरून तिला स्वतःकडे ओढण्याचा प्रयत्न करतात, नंतर आपला विचार बदलून कृती शेट्टीला मार्गदर्शन करू लागतात. त्यानंतर, ते व्यंकटेश आणि कल्याणराम यांना सीनसाठी कलाकारांच्या खांद्यावर हात कसे ठेवायचे याबद्दल सूचना देताना दिसतात.काहींनी राघवेंद्र राव यांच्या वागणुकीवर टीका केली, तर काहींनी त्यांचं समर्थन करत म्हटलं की, ते फक्त सुरुवातीचा शॉट दिग्दर्शित करत होते आणि कलाकारांना त्यांच्या स्थितीबद्दल सूचना देत होते. या व्हिडिओमुळे सोशल मीडियावर दिग्दर्शकावर टीका सुरू झाली असून, अनेक युजर्सनी दिग्दर्शकावर कलाकारांना विनाकारण स्पर्श केल्याचा आरोप केला आहे.एका युजरने लिहिलं की, 'हा म्हातारा माणूस नेहमी स्पर्श करण्याचा प्रयत्न का करतो?' दुसऱ्याने लिहिलं, 'हा म्हातारा मूर्ख कोण आहे? महिलांना त्याच्या परवानगीशिवाय स्पर्श करण्याचा अधिकार त्याला कोणी दिला?' या क्लिपमुळे निहारिका कोनिडेलाच्या जुन्या वादाची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. त्या घटनेचा संदर्भ देत एका युझरने लिहिलं, 'राघवेंद्र राव गारू, हे कसलं वागणं आहे? असा व्हिडिओ व्हायरल होण्याची ही काही पहिली वेळ नाही. निहारिकाच्या व्हिडिओवरून झालेल्या टीकेनंतर, मला वाटलं होतं की तुम्ही योग्य प्रकारे वागायला शिकला असाल. पण तुम्ही पुन्हा त्याच ठिकाणी आला आहात.'

# पोश कायदा व महिला सुरक्षा कायद्यांची कडक अंमलबजावणी करा

## राष्ट्रीय महिला आयोग अध्यक्षा विजया रहाटकर यांचे प्रशासनाला निर्देश...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांचे शोषण रोखण्यासाठी आणि त्यांच्या सुरक्षेसाठी पोश () कायद्यांतर्गत तक्रार समित्यांची तातडीने स्थापना करा, तसेच केंद्र व राज्य शासनाच्या सर्व महिलाभिमुख योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा, असे स्पष्ट निर्देश राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या महिला सुरक्षा, कायदे व विविध कल्याणकारी योजनांच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, जिल्हा आरोग्य अधिकारी अमोल गिते, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे तसेच विविध विभागाचे विभाख प्रमुख उपस्थित होते.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा (पोश ऍक्ट) च्या अंमलबजावणीबाबत बोलताना विजया रहाटकर म्हणाल्या की, ज्या संस्था किंवा आस्थापनांमध्ये १० पेक्षा जास्त कामगार कार्यरत आहेत, त्या सर्व ठिकाणी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. तसेच या समित्यांची नोंदणी शी-बॉक्स (-) पोर्टलवर करण्यात यावी. कौटुंबिक किंवा घरेलू काम करणाऱ्या महिलांच्या तक्रारींसाठी स्थानिक समितीमार्फत तातडीने न्याय मिळवून देण्यात यावा. या दोन्ही समित्यांनी अत्यंत तत्परतेने काम करावे आणि पीडित महिलांना न्याय द्यावा, असे निर्देश त्यांनी दिले. बैठकीत महिलांविरुद्ध होणारे गुन्हे आणि जिल्ह्यातील सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. महिला सुरक्षेसाठी कार्यरत असणाऱ्या दामिनी पथकाची गस्त अधिक प्रभावी करावी. जिल्हा संरक्षण अधिकाऱ्यांनी महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी अत्यंत तत्परतेने काम करावे. गंभीर गुन्ह्यांच्या बाबतीत पोलीस प्रशासनाने अधिक संवेदनशील राहावे आणि आपापसात समझोता करण्याच्या प्रवृत्तीवर कडक लक्ष ठेवावे, अशा सूचना त्यांनी पोलीस प्रशासनाला दिल्या. जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण पूर्णपणे शून्यावर आणण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय ठेवून व्यापक मोहीम राबवावी, असे निर्देशही अध्यक्षांनी दिले. शासनाच्या विविध योजनांचा आढावा घेताना त्यांनी महत्त्वाच्या सूचना केल्या. यामध्ये मुलींच्या उज्वल भविष्यासाठी आणि त्यांच्या सबलीकरणासाठी जिल्ह्यातील प्रत्येक मुलीचे सुकन्या समृद्धी खाते उघडण्यात यावे. यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घ्यावी. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक गर्भवती महिलेला मातृवंदना योजनेचा लाभ मिळेल याकडे विशेष लक्ष द्यावे. कोणतेही गर्भवती महिला योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. माझी लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू ठेवावी. अत्याचारग्रस्त व पीडित महिलांना तातडीने मदत देणाऱ्या मनोधैर्य योजनेचा लाभ विनाविलंब मिळवून द्यावा. संकटग्रस्त महिलांना एकाच छताखाली वैद्यकीय, कायदेशीर आणि मानसिक आधार देणाऱ्या वन स्टॉप सेंटरची कार्यपद्धती अधिक सुलभ आणि गतिमान करावी. तसेच या केंद्रातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करून हे केंद्र अधिक सक्षम करावे. ग्रामीण भागातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी ड्रोन दीदी योजनेला अधिकाधिक प्रोत्साहन द्यावे. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेत महिलांच्या नावे घरकुलांचे प्रमाण वाढवून त्यांना प्राधान्याने लाभ द्यावा.

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) आणि उमेद अभियानांतर्गत महिला बचत गटांचे काम जिल्ह्यात चांगले सुरू असून, त्यांनी महिलांच्या आर्थिक प्रगतीसाठी आणखी जोमाने काम करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ङ्घमहिलांच्या तक्रारींचे निवारण करताना प्रशासनाने अधिक संवेदनशील आणि तत्पर राहिले पाहिजे. जिल्ह्यातील प्रत्येक महिलेला सुरक्षित आणि सन्मानकारक वातावरण मिळणे हा त्यांचा हक्क असून, त्यामध्ये कोणतीही हलगर्जी सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. तसेच सक्षम महिलांची यशोगाथा समाजासमोर आणून इतर महिलांना प्रेरणा देण्याचे आवाहन राष्ट्रीय महिला आयोगाचे अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

---

## वाहन तपासणी मोहीम पारदर्शक व कायद्यानुसार

# उप प्रादेशिक परिवहन विभागाची माहिती

# अपघातांमध्ये १५.९९ टक्क्यांनी घट

**जनसंचलन/बुलढाणा**

उप प्रादेशिक परिवहन विभागामार्फत विशेष वाहन तपासणी मोहिमेसंदर्भात प्रसिद्ध झालेल्या बुलढाण्यात आरटीओचा ङ्घपुणेरीफ पॅटर्न!फ्ष या वृत्तातील आरोपांबाबत अधिकृत खुलासा करत वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे. संबंधित वृत्तातील अनेक दावे तथ्यहीन असून वाहन तपासणी व दंडात्मक कारवाई पूर्णपणे कायदेशीर आणि पारदर्शक पद्धतीने केली जात असल्याचे कार्यालयाने म्हटले आहे. परिवहन आयुक्तालयाच्या निर्दे शानुसार जिल्ह्यात सध्या विशेष वाहन तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. रस्ते सुरक्षा बळकट करणे, अपघातांचे प्रमाण कमी करणे आणि अवैध वाहतुकीवर नियंत्रण मिळविणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे कार्यालयाने स्पष्ट केले. वृत्तात उल्लेख केलेल्या दंडात्मक कारवाईच्या प्रकरणात संबंधित वाहनाने मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्याने नियमानुसार दंड आकारण्यात आला होता. या कारवाईचा अन्य कोणत्याही बाबींशी संबंध नसल्याचेही कार्यालयाने स्पष्ट केले आहे. उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये शासनाने दिलेले महसूल संकलनाचे शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण केल्याचा दावा केला आहे. संकलित झालेला संपूर्ण महसूल शासकीय तिजोरीत जमा करण्यात आला असून सर्व दंडाची रक्कम ई-चलन प्रणालीद्वारे थेट शासकीय खात्यात जमा होत असल्याने रोख व्यवहार किंवा मध्यस्थीला कोणतीही संधी नसल्याचे सांगण्यात आले. सध्या ओव्हरलोड वाहतूक, विनापरवाना वाहतूक तसेच कर न भरलेल्या वाहनांवर विशेष कारवाई सुरू असून भविष्यातही नियमांचे गंभीर उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे कार्यालयाने नमूद केले आहे. दरम्यान, वाहनधारकांना त्रास देणे हा विभागाचा उद्देश नसून रस्त्यावरील शिस्त राखणे आणि नागरिकांचे प्राण वाचविणे हेच प्रमुख ध्येय असल्याचे कार्यालयाने स्पष्ट केले. सततच्या तपासणी मोहिमा आणि रस्ता सुरक्षा जनजागृतीमुळे जानेवारी ते मे २०२५ च्या तुलनेत जानेवारी ते मे २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील अपघातांच्या संख्येत १५.९९ टक्के घट झाल्याचा दावा विभागाने केला आहे. कार्ड पद्धतफ किंवा टोकन सिस्टीमम यासारखी कोणतीही व्यवस्था अस्तित्वात नसून असे दावे पूर्णपणे काल्पनिक असल्याचे सांगत कार्यालयाने त्यांचे स्पष्ट खंडन केले आहे. वाहन तपासणी अथवा दंडात्मक कारवाईबाबत कोणतीही शंका, तक्रार किंवा आक्षेप असल्यास नागरिकांनी थेट उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बुलढाणा यांच्याशी संपर्क साधावा किंवा कार्यालयाच्या अधिकृत ई-मेलवर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नागरिकांमधील संभ्रम दूर करण्यासाठी हा खुलासा प्रसिद्ध करण्यात आल्याचे जिल्हा माहिती कार्यालयाने कळविले आहे.

---

# जिल्ह्यात पुरेसा जलसाठा उपलब्ध पाटबंधारे विभागाची माहिती

## अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील जलसाठ्याबाबत प्रसिद्ध झालेल्या खडकपूर्णा प्रकल्प शून्यावर तसेच १३ प्रकल्प कोरडे या वृत्तामुळे नागरिकांमध्ये जलटंचाईबाबत संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असल्याने पाटबंधारे विभागाने वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे. जिल्ह्यातील प्रमुख आणि मध्यम प्रकल्पांमध्ये उपयुक्त जलसाठ्यासह मोठ्या प्रमाणात मृत साठा उपलब्ध असल्याने सध्या पाणीटंचाईची परिस्थिती नसल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे. पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, संबंधित वृत्तातील आकडेवारी ही केवळ उपयुक्त जलसाठा (लाईव्ह स्टोरेज) यावर आधारित असून धरणांमधील मृत साठा (डेड स्टोरेज) विचारात घेण्यात आलेला नाही. त्यामुळे काही प्रकल्प पूर्णपणे कोरडे असल्याचा निष्कर्ष वस्तुस्थितीशी सुसंगत नसल्याचे विभागाने म्हटले आहे. १७ जून २०२६ रोजीच्या आकडेवारीनुसार नळगंगा, पेनटाकळी आणि खडकपूर्णा या तीन मोठ्या प्रकल्पांमध्ये एकूण ७७.१२ दशलक्ष घनमीटर उपयुक्त जलसाठा उपलब्ध आहे. याशिवाय खडकपूर्णा प्रकल्पात ६७.२० दशलक्ष घनमीटर मृत साठा शिल्लक असून प्रकल्प पूर्णपणे कोरडा असल्याचा दावा चुकीचा असल्याचे विभागाने स्पष्ट केले. तसेच ज्ञानगंगा, पलढग, मस, कोराडी, मन आणि उतावळी या सहा मध्यम प्रकल्पांमध्ये एकूण ५७.८२ दशलक्ष घनमीटर उपयुक्त जलसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता तातडीची जलटंचाई निर्माण होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचे पाटबंधारे विभागाने सांगितले. दरम्यान, उपलब्ध जलसाठ्याचे संरक्षण करण्यासाठी आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा रोखण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. विभागांतर्गत सर्व उपविभागीय कार्यालयांना महसूल विभागाच्या समन्वयाने आवश्यक ती कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पाटबंधारे विभागाने नागरिकांना अफवा किंवा अपूर्ण माहितींवर विश्वास न ठेवता अधिकृत आकडेवारीवर आधारित माहितीच ग्राह्य धरण्याचे आवाहन केले आहे. जिल्ह्यातील जलसाठ्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्यात येत असून पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांनी घाबरण्याचे कोणतेही कारण नसल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त बुलढाण्यात भव्य सामूहिक योग प्रात्यक्षिकाचे आयोजन

जनसंचलन-बुलढाणा

निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त बुलढाणा जिल्ह्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, यासंदर्भातील नियोजन बैठक जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरून रोड, बुलढाणा येथे संपन्न झाली. संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिनफ म्हणून घोषित केल्यानंतर योगाचे महत्त्व जागतिक स्तरावर अधिक अधोरेखित झाले आहे. त्यानुषंगाने जिल्हास्तर आयोजन समितीच्या वतीने आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे होत्या. यावेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नेहरू युवा केंद्राच्या दीक्षा पोमल, भारत स्काऊट गाईडचे जिल्हा संघटक, आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशांत लहासे तसेच योग क्षेत्रात कार्यरत विविध संस्था व संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत यंदाचा १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन जिल्हाभर उत्साहात साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हास्तरावर तसेच सर्व तालुकास्तरांवर शालेय विद्यार्थी, युवक-युवती आणि नागरिकांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी २१ जून २०२६ रोजी सकाळी ७ ते ७.४५ या वेळेत सामूहिक योग प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय मुख्य कार्यक्रम जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल, बुलढाणा येथे होणार असून सहभागी नागरिकांनी सकाळी ६.३० वाजेपर्यंत उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, शिक्षण विभाग, आयुष मंत्रालय, बुलढाणा जिल्हा योग संघटना, आरोग्य भारती, क्रीडा भारती, आर्ट ऑफ लिव्हिंग, पतंजली योग समिती, नेहरू युवा केंद्र, विविध क्रीडा मंडळे, महिला मंडळे, आयुर्वेद व नर्सिंग महाविद्यालये तसेच योग क्षेत्रात कार्यरत विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. यावेळी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, शासकीय व निमशासकीय कार्यालये, क्रीडा मंडळे, अधिकारी-कर्मचारी, खेळाडू, युवक-युवती आणि योगप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. तसेच स्थानिक स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या योग कार्यक्रमांचा अहवाल, छायाचित्रे, सहभागींची संख्या आणि कार्यक्रमाची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले. आंतरराष्ट्रीय योग दिनाचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवून योग संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे यांनी केले.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त बुलढाण्यात भव्य सामूहिक योग प्रात्यक्षिकाचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त बुलढाणा जिल्ह्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, यासंदर्भातील नियोजन बैठक जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरून रोड, बुलढाणा येथे संपन्न झाली. संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिनफ म्हणून घोषित केल्यानंतर योगाचे महत्त्व जागतिक स्तरावर अधिक अधोरेखित झाले आहे. त्यानुषंगाने जिल्हास्तर आयोजन समितीच्या वतीने आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे होत्या. यावेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नेहरू युवा केंद्राच्या दीक्षा पोमल, भारत स्काऊट गाईडचे जिल्हा संघटक, आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशांत लहासे तसेच योग क्षेत्रात कार्यरत विविध संस्था व संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत यंदाचा १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन जिल्हाभर उत्साहात साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हास्तरावर तसेच सर्व तालुकास्तरांवर शालेय विद्यार्थी, युवक-युवती आणि नागरिकांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी २१ जून २०२६ रोजी सकाळी ७ ते ७.४५ या वेळेत सामूहिक योग प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय मुख्य कार्यक्रम जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल, बुलढाणा येथे होणार असून सहभागी नागरिकांनी सकाळी ६.३० वाजेपर्यंत उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, शिक्षण विभाग, आयुष मंत्रालय, बुलढाणा जिल्हा योग संघटना, आरोग्य भारती, क्रीडा भारती, आर्ट ऑफ लिव्हिंग, पतंजली योग समिती, नेहरू युवा केंद्र, विविध क्रीडा मंडळे, महिला मंडळे, आयुर्वेद व नर्सिंग महाविद्यालये तसेच योग क्षेत्रात कार्यरत विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. यावेळी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, शासकीय व निमशासकीय कार्यालये, क्रीडा मंडळे, अधिकारी-कर्मचारी, खेळाडू, युवक-युवती आणि योगप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. तसेच स्थानिक स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या योग कार्यक्रमांचा अहवाल, छायाचित्रे, सहभागींची संख्या आणि कार्यक्रमाची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले. आंतरराष्ट्रीय योग दिनाचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवून योग संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे यांनी केले.

# सिंदखेडराजा ग्रामीण रुग्णालय येथे जागतिक सिकलसेल आजार नियंत्रण दिन उत्साहात साजरा

जनसंचलन/बुलढाणा

जागतिक सिकलसेल आजार नियंत्रण दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय सिंदखेडराजा येथे तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय सिंदखेडराजा व ग्रामीण रुग्णालय सिंदखेडराजा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ दत्तात्रय बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम वैद्यकीय अधीक्षक डॉ. विलास दराडे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्रकुमार साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. यावेळी सिकलसेल आजाराबाबत जनजागृती करताना नवविवाहित तसेच विवाहयोग्य युवक-युवतींनी विवाहपूर्व सिकलसेल तपासणी करून घेणे हा आजार नियंत्रणात आणण्याचा सर्वात प्रभावी उपाय असल्याचे सांगण्यात आले.

सिकलसेल जाणूया, सिकलसेल टाळूया हा संदेश देत उपस्थितांना सिकलसेल आजाराची माहिती देण्यात आली. सिकलसेल आजारामध्ये वारंवार ताप येणे, थकवा जाणवणे, रक्ताची कमतरता, अशक्तपणा, सांधेदुखी, जंतुसंसर्ग होणे, पोटाच्या डाव्या बाजूस वेदना होणे व चेहरा निस्तेज दिसणे अशी लक्षणे आढळू शकतात. हा आजार पुढील पिढीत जाऊ नये यासाठी प्रत्येक युवक-युवतीने विवाहपूर्व तपासणी करून घेणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन करण्यात आले. सिकलसेल तपासणी ही शासकीय रुग्णालयांमध्ये विनामूल्य उपलब्ध असून अधिक माहितीसाठी नागरिकांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी अथवा सिकलसेल समुपदेशक यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.



कार्यक्रमाचे संचालन प्रमुख शास्त्र तंत्रज्ञ वर्षा डोंगरदिवे यांनी केले तर आभार प्रदर्शन तालुका सिकलसेल सहाय्यक प्रवीण शिंदे यांनी केले. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. विलास दराडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. परमेश्वर चाटे, डॉ. सैय्यद रेहान, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्रकुमार साळवे, तालुका आरोग्य सहाय्यक दादाराव खरात, औषध निरीक्षक दिलीप मेहेत्रे, डॉ. बुधवत, डॉ. खान, डॉ. गाणार, अतिश जाधव, नारायण सुरवसे, नितीन इंगळे, लक्ष्मण राठोड, गणेश गवई, विशालराव खरात तसेच इतर आरोग्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
हॅलो बुलडाणा
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८